नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 27/12/2021 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील मौजा गिरड रोड सोयाबिन कंपनी जवळ धुरखेडा येथे दिनांक 25/12/2021 चे 19:30 वा. ते 20.00 वा. दरम्यान एम.एच.–40/बीजी–4761 क्रमांकाच्या ट्रकचा चालक आरोपी नामे– राजकुमार उमाशंकर यादव, वय 42 वर्ष, रा. ध्रा पो.स्टे. कुभेला जि. बलीया उत्तर प्रदेश याने आपल्या ताब्यातील ट्रक हा भरधाव वेगाने व निष्काळजीपणे धोकादायकरित्या चालवुन अचानकपणे निर्भय काटयाकडे डाविकडे कोणत्याच प्रकारचे सिग्नल न देता (इंडिकेटर) न देता वळल्याने पाठीमागुन येणाऱ्या एमएच– 40/8725 क्रमांकाच्या होन्डा शाईन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक आकाश अशोक गिरडकर (मृतक) वय 25 वर्ष रा. मंगळवारीपेठ, उमरेड हा जखमी होवुन मोटरसायकलसह रोडवर पडला. तरीदेखील आरोपी ट्रक चालकाने कोणत्याच प्रकारची वैदयकीय मदत न करता घटनास्थळावरून पळुन जावुन त्याचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि राजु वासुदेव डोर्लीकर पोस्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 अ ब मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री पाटील मो. क्र. 9049989341 हे करीत आहे.

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 11 कि. मी. अंतरावरील मौजा गरांडा येथे दिनांक 26/12/2021 चे 19:00 वा. दरम्यान आरोपी नामे– नागेश शालीक उके, वय 25 वर्ष, रा. वाघोडा याने फिर्यादी नामे– चरण निंबाजी आपुरकर वय 53 वर्ष, रा. गरांडा ता. पारशिवनी याचे घरा समोर रोडवर आपली मोटरसायकल आडवी उभी केल्याने फिर्यादी याने आरोपी यास हटकले. आरोपीने फिर्यादीला अशलील शब्दात शिवीगाळ करून 'तुझ्या बापाचा रोड आहे का' असे म्हणुन मोटरसायकलने निघुन गेला. यानंतर आरोपीने काही वेळाने मोटरसायकलने परत येउन लोखंडी तलवार हातात घेउन हवेत फिरवुन फिर्यादीला शिवीगाळ करून जिवाणे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 294, 506 भादवी सहकलम 4, 25 भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार झोड मो.क्र. 8806353446 हे करीत आहेत.

## अकस्मात मृत्यु

1) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 20 कि. मी. अंतरावरील मौजा मांडवी शिवार फिर्यादीचे शेतातील बंगल्यात येथे दिनांक 26/12/21 चे 10:30 वा. सुमारास फिर्यादीचा भाऊ नामे– कोमल उर्फ कमलेश पंचमजी चांदेकर (मृतक) वय 29 वर्ष रा. वार्ड क 16 मोहपा ता कळमेश्वर याने त्याचे शेतातील बंगल्याचे पंप मध्ये असलेले मोनोक्रॅान नावाचे औषध प्राशन केल्याने मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– देवेंद्र उर्फ देवा पंचमजी चांदेकर वय 29 वर्ष रा वार्ड क्र. 16 मोहपा ता. कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनि श्री सतिश पाटील मो.क. 8805253982 हे करीत आहे.

2) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 5 कि.मी अंतरावरील मौजा थुगावदेव शिवार वर्धा नदी पात्र येथे दिनांक 26/12/21 चे 10.20 वा. पुर्वी फिर्यादीचा मोठा भाऊ मनोहर रामचंद्र लोहे(मृतक) वय 75 वर्ष रा.थुगावदेव ता नरखेड हा दि. 24/12/21 रोजी त्याच्या आत्याकडे मौजा बाबुळखेडा ता.वरुड यांच्या कडे जातो म्हणून घरुन निघुन गेला. दि. 26/12/21 रोजी मृतक हा त्याच्या शेतातुन घरी परत येत असतांना शेताला लागुन असलेल्या वर्धा नदी च्या पात्रातील साचलेल्या पाण्यात पडुन पाण्यात बुडुन मरण पावलेल्या अवस्थेत आढळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बबन रामचंद्र उर्फ लक्ष्मण लोहे, वय 67 वर्ष, रा. थुगावदेव ता नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार रिधोरकर मो.नं. 8007671986 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर